# Add-on courses for college students

TIMES NEWS NETWORK

PUNE MIRROR
Wakes you up!
Complimentary with this copy of The Times of India*
*For Pune & Pimpri-Chinchwad Only

Pune: The University of Pune, along with Global Talent Track, announced a programme offering college students add-on courses that will help them understand the requirements of industry and make them 'industry-ready' when they graduate.

The programme will be initially rolled out in 100 colleges affiliated to the university and the number of students expected to enrol is 30,000, vice-chancellor Narendra Jadhav said on Wednesday.

The programme will offer orientation and training in the information technology enabled services segment that needs human resources in huge numbers. These will include banking and financial services, insurance and retail, Jadhav said.

The programme contains three modules of 132 hours each, comprising awareness, skill training and employability development, Jadhav said, adding that the students are expected to complete these modules side by side their basic degree education. "The programme is optional, but we are confident that the students will find it relevant," Jadhav said.

Uma Ganesh of Global Talent Track said the outsourcing opportunity for India is very big and we need to prepare the country's youth to take up work that goes beyond call centres and other basic business process outsourcing categories. There will be opportunities in newer areas such as finance and accounting or publishing, she added.


Cisco, in the field of connectivity and networking technology, is the technology partner for the programme.

Times of India 2/10/8

# पुणे नवरात्र महोत्सव राष्ट्रीय ख्यातीचा : जाधव

पुणे : पुणे नवरात्र महोत्सवात साजरे होणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची रसिकांना मेजवानी पाहता हा महोत्सव राष्ट्रीय ख्यातीचा ठरला असल्याचे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले. पुणे नवरात्र महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

गणेश कला क्रीडा रंगमंच येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार उल्हास पवार हे होते. यावेळी खासदार सुरेश कलमाडी, आमदार चंद्रकात छाजेड, रमेश बागवे, मोहन जोशी आदि उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कला क्षेत्रातील नामवंत शाहीर विठ्ठल उमप, सिने अभिनेता प्रसाद ओक, सामाजिक कार्यकर्त्या शुभांगी भालेराव यांचा कला-संस्कृती पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच कवि प्रा. फ. मु. शिंदे व अभिनेत्री मधु कांबीकर यांना या वर्षीचा 'श्री लक्ष्मी माता कला संस्कृती विशेष पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उल्हास पवार म्हणाले, कोणत्याही संस्थेच्या आर्थिक निधीशिवाय गेली १२ वर्षे या महोत्सवाच्या माध्यमातून रसिकांना विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आनंद देण्याचे काम आबा बागुल समर्थपणे करीत आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम महाराष्ट्राबाहेर गेला असल्यामुळे या महोत्सवाला एक आगळेवेगळे महत्त्व प्राप्त झाले असल्याचे त्यांनी सांगितले.



पुणे नवरात्र महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी शाहीर विठ्ठल उमप यांना श्री लक्ष्मीमाता कला संस्कृती पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महोत्सवाचे आयोजक आबा बागुल यावेळी उपस्थित होते.

या वेळी कार्यक्रमाच्या प्रारंभी पद्मश्री खाँ साहेब उस्मान खाँ यांच्या शिष्यांचे सतार वादन, रत्नाकर शेळके, डान्स ॲकेडमीच्या वतीने गणेश वंदना, देवी वंदना, लावणी, महाराष्ट्राची लोकधारा आदि कार्यक्रमांचे सादरीकर करण्यात आले. महोत्सवाचे अध्यक्ष आबा बागुल, नंदकुमार नानगुडे, रमेश भंडारी, राजेंद्र बागुल यांच्या हस्ते करण्यात आले. प्रकाश पायगुडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसचालन केले.

केसरी 1/10/8

# महाविद्यालये देणार व्यावसायिक प्रशिक्षण

पुणे (प्रतिनिधी) : पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता पुणे विद्यापीठ क्षेत्रातील निवडक शंभर महाविद्यालयांमधील तीस हजार विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देण्यात येणार असल्याची घोषणा पुणे विद्यापीठाचे कुलगुरू नरेंद्र जाधव यांनी केली.

ग्लोबल टॅलेन्ट टेक, सीसको ग्लोबल इनिशिएटिव्ह, आणि नासकॉम यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. याबाबत करार बुधवारी करण्यात आला. या वेळी ग्लोबल टॅलेन्ट ट्रेकच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उमा गणेश, सीसको ग्लोबल इनिशिएटीव्हचे प्रमुख रोबी बर्टन, नासकॉमचे अध्यक्ष डॉ. गणेश नटराजन उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले की, या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना मनुष्यबळ व्यवस्थापन, साखळी -पुरवठा व्यवस्थापन, कॉल सेंटर बँकिंग, विमा या विषयावर आधारित अभ्यासक्रमांच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे पारंपरिक पद्धतीने पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास मदत होणार आहे. विशेष करून आदिवासी आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी करून घेतले जाणार आहे. त्याचबरोबर गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही या उपक्रमाअंतर्गत दिली जाणार आहे.

डॉ. उमा गणेश म्हणाल्या, येत्या १ डिसेंबरपासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात येणार असून, महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न या पुढील कालात केला जाणार आहे. ग्रामीण, निमशहरी आणि शहरी असे विभागवार साधारणत: तीन ते पाच हजार रुपयांपर्यंत शुल्क या अभ्यासक्रमांकरिता ठेवण्यात आले आहे.

पुढारी 2/10/8

चिंतन इमेज मेकर्स

# महाराष्ट्राची नव्हे देशाची सांस्कृतिक राजधानी पुणे : डॉ. नरेंद्र जाधव

पुणे, दि. ३० (प्रतिनिधी) - पुण्याला नेहमीच चांगले शहर म्हणून ओळखले जाते. पूर्वी महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून पुणे शहराला ओळखले जाते. जशी भारताची राजधानी दिल्ली आहे, तशी सांस्कृतिक राजधानी म्हणून पुण्याला महाराष्ट्राची नव्हे तर देशाची म्हणून ओळखली जात आहे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

आबा बागुल आयोजित पुणे नवरात्र महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार, आमदार मोहन जोशी, खासदार सुरेश कलमाडी व नगरसेवक उपस्थित होते. यावेळी पुणे नवरात्र महोत्सवानिमित्त देण्यात येणारा श्री लक्ष्मीमाता कला-संस्कृती पुरस्कार शाहीर विठ्ठल उमप, अभिनेता प्रसाद ओक व सामाजिक व धार्मिक कार्यकर्त्या सुभांगी भालेराव तर श्री लक्ष्मीमाता कला-संस्कृती विशेष पुरस्कार कवी फ. मुं. शिंदे व अभिनेत्री मधू कांबीकर यांना प्रदान करण्यात आला.

पुणे नवरात्र महोत्सवाला तेरा वर्षे पूर्ण होत आहेत. सुरुवातीस महोत्सव सुरू झाल्यानंतर सलग दोन वर्षे के. रामकृष्ण मोरे यांनी या महोत्सवाला निधी दिला. मात्र आता महानगरपालिका, आयटीसी व एमटीडीसी यांच्याकडून काहीही निधी उपलब्ध होत नाही, असा टोला उल्हास पवार यांनी खासदार सुरेश कलमाडी यांचे नाव न घेता आपल्या भाषणात लगावला.

डॉ. जाधव म्हणाले की, नृत्य, संगीत, भजन, भक्तिगीत व लावणी अशा प्रकारचे कार्यक्रम सातत्याने १३ वर्षे पुणेकरांसमोर सादर करून एक चांगली मेजवानीच दिली आहे. त्यामुळे लोकोत्सवाचे स्वरूप निर्माण झाले आहे. यावेळी पुरस्कारार्थी व पवार यांनी मनोगत व्यक्त केले. उत्सवाच्या उद्घाटनाआधोदर खाँ साहेब उस्मान खाँ यांनी सतारवादन; रत्नाकर शेळके अॅकॅडमीने गणेश वंदना, लावणी-स्वप्ना संगमनेरकर, लोककला व देवी स्तवन प्राजक्ता माळी यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या उद्घाटनानंतर राजस सुकुमार तुपुरनाद, स्वाती दैठणकर यांनी उत्कृष्ट कार्यक्रम सादर केला.



पुणे नवरात्रौ महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते (अनुक्रमे) लक्ष्मीमाता कला-संस्कृती पुरस्कार शाहीर विठ्ठल उमप, अभिनेत्री मधू कांबीकर, कवी फ. मुं. शिंदे आणि अभिनेता प्रसाद ओक यांना प्रदान करण्यात आला. यावेळी महोत्सवाचे अध्यक्ष आबा बागूल, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार, आमदार मोहन जोशी आदी. (छाया : सतीश निर्मळ)

पुण्यनगरी 11/10/8

# जळगाव पीपल्स बँकेचे कार्य आदर्शवत : डॉ. जाधव

पुणे, दि. ६ : जळगाव पीपल्स बँकेने सहकाराच्या माध्यमातून उदात्त तत्त्वांचे पालन केले आहे. बँकेची ही कामगिरी आदर्शवत आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

जळगाव पीपल्स बँकेच्या पिंपरी शाखेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे अप्पर आयुक्त भास्करराव शेळके, बँकेचे चेअरमन भालचंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जाधव म्हणाले, बँकेने सभासदांच्या फायद्याच्या अनेक योजना राबविल्या आहेत. बँकेने सलग ६० वर्षे नफा मिळवून आगळा विक्रम केला आहे. बँकेची ही आदर्शवत कामगिरी राज्याबरोबर देशपातळीवर दखल घेण्याजोगी आहे. बँकेने व्यवसायाबरोबरच प्रेम व जिव्हाळाही जोपासला आहे.

शेळके म्हणाले, सहकारात जळगाव पीपल्स आदर्शवत बँक आहे. महाराष्ट्रात ही बँक प्रथम क्रमांकावर आहे. राज्याच्या विकासात सहकारी बँका आणि पतसंस्थांचा वाटा मोठा आहे. जळगाव पीपल्स बँकेने अडचणीत सापडेल्या बँका आणि पतसंस्थांना दत्तक घेऊन मार्गदर्शन करावे. बँकेने विकसित केलेली कोअर बँक प्रणाली सोपी असून इतर सहकारी बँकांनी ती आत्मसात करावी, अशी शिफारस आपण करणार आहोत.



जळगाव पीपल्स बँकेच्या पिंपरी शाखेचे उद्घाटन करताना डॉ. नरेंद्र जाधव, समवेत भास्करराव शेळके, भालचंद्र पाटील व इतर मान्यवर.

भालचंद्र पाटील म्हणाले, बँकेची सातत्याने प्रगती होत असून बँकेची आर्थिक स्थिती भक्कम आहे. कोअर बँकींग प्रणाली विकसित करणारी जळगाव पीपल्स ही राज्यातील एकमेव बँक आहे. रिझर्व्ह बँकेने या बँकेला शाखा विस्ताराची परवानगी दिली आहे. १ ऑक्टोबर रोजी बँकेची औरंगाबाद शाखा सुरू झाली आहे. भविष्यात पुण्यातही शाखा सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दादा नेवे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी बँकेचे संचालक दत्तात्रय चौधरी, स्मीता पाटील, प्रा. विलास बोरोले, रमेश पाटील, प्रागजी गुजराती, कर्मचारी प्रतिनिधी नामदेव चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटकर, बँकेचे महाव्यवस्थापक संतोष वाणी, बी. एस. कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी भास्करराव शेळके यांच्या हस्ते बँकेच्या एटीएम सेवेचे उद्घाटनही झाले.

लोकमत 7/10/8

चिंतन इमेज मेकर्स

घडामोडी

# लघुउद्योगांना चालना देणारे औद्योगिक धोरण हवे : मेधा पाटकर

**पुणे (प्रतिनिधी) :** शेतकऱ्यांच्या आत्महत्या पॅकेजने किंवा कर्जमाफीने थांबणार नाहीत. त्यासाठी शेती व उद्योगातील दरी कमी करून शेतीवर आधारित लघुउद्योगांना चालना देणारे औद्योगिक धोरण राबवायला हवे, असे मत नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या मेधा पाटकर यांनी व्यक्त केले.


एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन व नानासाहेब गोरे अकादमी यांनी आयोजित केलेल्या नानासाहेब गोरे व्याख्यानमालेत 'भारतीय शेतीवरील संकट आणि औद्योगीकरणाची दिशा' या विषयावर श्रीमती पाटकर बोलत होत्या. धुळे येथील मानवाधिकार कृती गटाचे निमंत्रक ॲड. निर्मलकुमार सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होते. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अविनाश पाटील उपस्थित होते.

पाटकर म्हणाल्या, "देशात औद्योगीकरणाच्या नावाखाली विशेष आर्थिक क्षेत्राच्या रूपात विशेष विदेश क्षेत्रे निर्माण करण्याचे काम सुरू आहे. शेतीशी काहीही संबंध नसलेल्या उद्योगांसाठी शेतजमिनीचा वापर व प... आणि सिंचन नियोजन नसल्याने शेती व जैवविविधता संकटात सापडली आहे. जलजमीन नियोजन देशाच्या केंद्रभागी असायला हवे. कोरडवाहू शेती तंत्राचा वापर करून शेती संकटातून बाहेर काढण्यास वाव आहे. यासाठी कोरडवाहू शेतीला चालना देण्याचे प्रसार करण्याचे धोरण शासनाने राबवायला हवे." शासनाने शेती व त्यावर आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी ग्रामसभेला जादा अधिकार द्यावेत, शेतमालाला किंमत वाढवून द्यावी व पाणी आणि जमिनीच्या नियोजनाला प्राधान्य द्यावे अशी मागणी पाटकर यांनी या वेळी केली.

**फक्त आकड्यांचा अहवाल**

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी शासनाला सादर केलेला आत्महत्यांविषयक अहवाल वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा आहे. विद्यापीठाच्या ग्रंथालयात बसून तयार केलेला हा आकड्यांचा अहवाल आहे, अशी टीका ॲड. सूर्यवंशी यांनी केली. तर मेधा पाटकर यांनी हा अहवाल अनेक बाबींना फक्त स्पर्श करतो. त्यांचे पुरेसे स्पष्टीकरण देण्यास कमी पडतो अशी खंत व्यक्त केली.

अॅग्रोवन 17/10/8



गणेश कला क्रीडा मंच : पुणे बुक फेअरचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते बुधवारी झाले. उद्घाटनानंतर डॉ. जाधव यांनी प्रदर्शनाला भेट दिली.

सकाळ 16/10/8

पुढारी 10/10/8

# 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हेच डॉ. आंबेडकरांच्या जीवनाचे सार

**पुणे (प्रतिनिधी) :** 'डॉ. बाबासाहेबांवर केवळ भक्ती दाखवून उपयोग नाही, तर त्या भक्तींला शक्तीत बदलले पाहिजे, तरच बहुजनांचे खऱ्या अर्थाने हित होईल व बहुजन समाज हा 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' होईल. ज्या लोकांत माझा जन्म झाला आहे त्या लोकांचा उद्धार करणे माझे आद्य कर्तव्य आहे, अशी ज्याची भावना आहे ती व्यक्ती धन्य होय,' असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले. आस्था फौंडेशन आयोजित कांशीराम यांच्या द्वितीय स्मृतिदिनी व धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत ते बोलत होते.


यावेळी सिंबायोसिस विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. विजय खरे, नेस वाडिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डिंपल कांबळे होत्या.

यावेळी डॉ. मुजुमदार म्हणाले की, चारित्र्याची जोड असल्याशिवाय विद्या फलित होऊ शकत नाही. आपण ज्या पद्धतीने बुद्धाला शरण जातो, धम्माला व संघाला शरण जातो त्याप्रमाणे आपण यापुढे भीमाला शरण गेले पाहिजे.

डॉ. विजय खरे यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी नेहरूंना चीनच्या बाबतीत राजकीय धोरण स्पष्ट राबविण्याची सूचना केली होती. त्या सूचनेकडे दुर्लक्ष केल्यामुळे भारत-चीन दरम्यान झालेल्या युद्धात ९० हजार स्क्वेअर मीटर जमीन चीनच्या घशात गेली. त्यांनी ३५६ या कलमाच्या अनुषंगाने भारतीय सुरक्षिततेचे महत्त्व व त्यामुळे सर्व राज्ये कशी एकमेकांना सुरक्षितता प्रदान करतात याचे महत्त्व पटवून दिले.

डॉ. भगवान ठाकूर यांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांवर काव्य करत उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन नितीन डाळींबे यांनी, तर आभार उत्तम गायकवाड यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत कांबळे, गौतम कोठे सर, ॲड. सागर नेवसे, जोगदंडेदादा, डी. एम. कांबळे व मनोज रणपिसे यांनी परिश्रम घेतले.



आस्था फाउंडेशनद्वारा आयोजित व्याख्यानमालेत डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. भगवान ठाकूर व डॉ. विजय खरे उपस्थित होते.

चिंतन इमेज मेकर्स

# सामाजिक विषमतेमुळेच देशाची अधोगती – डॉ. नरेंद्र जाधव

बारामती, दि. ७ (प्रतिनिधी)– गेल्या काही वर्षांत देशाच्या झालेल्या अधोगतीस सामाजिक विषमताच कारणीभूत आहे. देशातील गरीबांना स्वविकासाची संधी उपलब्ध होत नाही. ही चिंताजनक बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या अर्थकारणाचा अवलंब केला तर अनेक प्रश्न सुटतील, असे मत अर्थतज्ज्ञ व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

माता रमाई व्याख्यानमालेचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील समर्थ भारत' या विषयावर तिसरे पुष्प त्यांनी गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रकाश पवार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून दादासाहेब दैठणकर उपस्थित होते.

डॉ. जाधव पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्वान अर्थतज्ज्ञ होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी मिळाली. ही पदवी आजपर्यंत कोणालाही मिळाली नाही. भारतांत आंबेडकरांच्या अर्थशास्त्रावर अनेक विद्यार्थी विद्यापीठात अभ्यास करतात. त्या आंबेडकरांच्या अर्थशास्त्राकडे देशाचे दुर्लक्ष झाले आहे. भारतातील तेरा वित्त आयोगाच्या ज्या सूचना होत्या त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथातील आहेत. रिझर्व्ह बँकेची स्थापना करतांना डॉ. बाबासाहेबांनी एक प्रतिपादन केले होते. सरकारला जो अर्थपुरवठा होणार आहे त्यावर अंकुश ठेवला पाहिजे, ही काळाची गरज आहे, असे सांगून ते पुढे म्हणाले की, १९२२ साली सावकारी विधायक पास झाले असते आणि त्यातील तीन तरतूदींची अंमलबजावणी केली असती तर आज सावकारांकडून होणारी फसवणूक व अन्याय झाले नसते.

अध्यक्षीय भाषण प्रा. प्रकाश पवार यांनी केले. प्रास्ताविक जयराम शेलार व आभार अशोक सोनवणे यांनी व्यक्त केले. या व्याख्यानमालेस बारामती परिसरातील फुले, शाहू, आंबेडकरी विचाराच्या संघटना, विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## विशेष कौशल्यांचे प्रशिक्षण

# पदवी पूर्ण होताच नोकरी?

## पुणे विद्यापीठ : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाची घोषणा

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १ : कला, वाणिज्य आणि शास्त्र या शाखांच्या विद्यार्थ्यांचे पदवीचे शिक्षण पूर्ण होताच त्यांना नोकरी मिळावी, यासाठी पुणे विद्यापीठातर्फे विशेष अभ्यासक्रमाची घोषणा बुधवारी करण्यात आली. नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने विशेष कौशल्यांचे प्रशिक्षण या अभ्यासक्रमाद्वारे दिले जाणार आहे. पदवीचे शिक्षण घेतानाच विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम तीन टप्प्यांत पूर्ण करता येणार आहे.

पुणे विद्यापीठासह ग्लोबल टॅलेंट ट्रॅक (जीटीटी), सिस्को ग्लोबल इनिशिएटीव आणि नासकॉम यांच्या सहकार्याने पहिल्या टप्प्यात पुणे, नाशिक आणि नगर येथील विद्यापीठाशी संलग्न शंभर महाविद्यालयांत हा उपक्रम राबविला जाणार आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव आणि ग्लोबल टॅलेंट ट्रॅकच्या डॉ. उमा गणेश यांनी या उपक्रमाच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. सिस्को ग्लोबल इनिशिएटीवचे प्रमुख टोबी बर्टन, ग्लोबल टॅलेंट ट्रॅकचे जनरल एस. मेहता, नासकॉमचे प्रमुख डॉ. गणेश नटराजन, किरण कर्णिक, नॅशनल नॉलेज कमिशनचे सदस्य डॉ. किरण दातार, संगणकतज्ज्ञ दीपक शिकारपूर या वेळी उपस्थित होते.

या प्रसंगी झालेल्या पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. जाधव यांनी उपक्रमाची माहिती दिली. ते म्हणाले, "हा अभ्यासक्रम 'प्रायमरी', 'इंटरमिजिएट' आणि 'ॲडव्हान्स' अशा तीन स्तरांवर राबविला जाईल. एकूण अभ्यासक्रम १३२ तासांचा असणार आहे. विद्यार्थी तो एका वर्षात अथवा पदवीच्या प्रत्येक वर्षी एक स्तर याप्रमाणे तीन वर्षांत पूर्ण करू शकतील. ७० टक्के 'व्हर्चुअल क्लासरूम' (संगणकावर प्रशिक्षण) आणि तीस टक्के प्रत्यक्ष शिक्षकांचे मार्गदर्शन असे त्याचे स्वरूप आहे. या अभ्यासक्रमाचे एकूण शुल्क साडेसात हजार ते बारा हजार रुपये असणार आहे. दुर्गम भागातील विद्यार्थी, मागासवर्गीय विद्यार्थी, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल. विद्यार्थिनींनाही विशेष सवलत दिली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात शंभर महाविद्यालयांतील तीस हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोचण्याचे ध्येय आहे. या अभ्यासक्रमासाठी येत्या १ नोव्हेंबरपासून एक हजार शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, तसेच प्रत्यक्ष अभ्यासक्रम १ डिसेंबरपासून सुरू होईल. अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरू करणारे पुणे विद्यापीठ हे पहिलेच विद्यापीठ आहे. पुणे, नाशिक आणि नगर मिळून शंभर महाविद्यालये आहेत. अभ्यासक्रम सर्व महाविद्यालयांमध्ये टप्प्याटप्प्याने सुरू केला जाईल."

डॉ. उमा गणेश म्हणाल्या, "या अभ्यासक्रमाची आखणी विद्यापीठासह जागतिक पातळीवरील संस्थांनी केली आहे. एकत्रित इंटरनेटवर प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांना सर्वोत्तम आणि सर्वांगीण विकासासाठी पूरक ठरेल. शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी त्याचा उपयोग होणार आहे. बँकिंग, विमा, साखळी-पुरवठा व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, अगत्य, आरोग्य व्यवस्थापन अशा विषयांचा त्यात समावेश करण्यात आला आहे."

### शिष्यवृत्ती मिळणार

या अभ्यासक्रमासाठी मागासवर्गीय, तसेच दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. गुणवंत विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनाही सवलत दिली जाणार आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात समाजाच्या सर्वच स्तरातील विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी, विशिष्ट कौशल्याअभावी असे विद्यार्थी नोकरीपासून वंचित राहू नयेत, हा अभ्यासक्रमाच्या आखणीचा मुख्य हेतू असल्याचेही कुलगुरू डॉ. जाधव यांनी सांगितले.

सकाळ
२/१०/७

चिंतन इमेज मेकर्स

THE TIMES OF INDIA, PUNE **
THURSDAY, OCTOBER 2, 2008



# Teachers want earned leave retained

## Professors Also Highlight Shortage Of Staff And Pathetic Condition of Hostels

TIMES NEWS NETWORK

Shyam Sonar



UoP college professors demonstrate outside V-C Narendra Jadhav's office on Wednesday

**Pune:** Demanding withdrawal of the university management council's decision to cancel earned leave of college teachers with immediate effect, more than 300 college professors, under the aegis of the Pune University and College Teachers' Organisation (Pucto), Pune University Teachers' Organisation (Puto) and the University Forum, staged a protest outside vice-chancellor Narendra Jadhav's office on Wednesday.

Professors from Pune, Ahmednagar and Nashik sat outside the V-C's office from 11 am to 4 pm shouting slogans and presenting their demands. "For 20 years we have been entitled to earned leave. How can the management council, all of a sudden, cancel it," asked Pucto secretary R.T. Aher.

At a meeting on August 22, the management council has decided to discontinue University rule 424 (c), which allows professors to take earned leave.

The professors said the UoP was doing injustice to teachers and that it has no right to scrap the rule. "The management council cannot cancel any rule without undergoing a certain procedure. This attitude of the varsity is not accepted. We will protest till the university withdraws its decision," Dnyaneshwar Kadam, a professor, told TOI.

According to university officials, "different universities follow different patterns. Some universities take into consideration privilege leave, which is not encashed, while some universities like UoP consider earned leave which can be encashed. This issue was raised way back in 1983-84 also. But now, with several employees nearing retirement, it has cropped up again."

There are about 10,000 employees recruited by the UoP and each gets nearly Rs 2 lakh as earned leave encashment. University officials said that it was not possible for them to pay so much money to the employees. Even if the earned leaves were to be encashed, the dispute is who would pay the money — the college or the university.

When the Pucto members met Jadhav on September 26, he assured that some decision will be taken on the issue and sought a little time to act upon, said Aher. "We are only being given assurances by the V-C. Nothing concrete is happening."

The professors also raised other issues, which included shortfall of about 40 per cent teaching staff in colleges.

There are not enough hostels for the growing student population and the hostels are in terrible conditions. To meet this ever-increasing demand, the professors demanded better hostel facilities. They also demanded conveyance allowance on par with the members of the management council, who get Rs 8 per km, while the professors get Rs 5 per km.

चिंतन इमेज मेकर्स

**UGC NOD**

# COEP seeks deemed university status, to send proposal soon

**DEENDAYAL VAIDYA**
reporters@sakaaltimes.com

**Pune:** Is it the graduation ceremony or the convocation ceremony? If plans work out, College of Engineering, Pune (COEP) would not need to bother about such questions after a couple of years as it would be in position to confer its own degrees under deemed university status.

Already an autonomous institute, COEP plans to send a proposal next month to University Grants Commission (UGC) for the status.

COEP director Dr Anil Sahasrabuddhe confirmed the report and said, "We will send the proposal next month. UGC has certain criteria for such status. As an autonomous institute we have already fulfilled many of them. The board of governors as well as accounting system are in place. But the most important aspect of Deemed University is research culture. Institute has to be in thick of research before Deemed University status is granted. Only undergraduate education is not sufficient. COEP has strived to cultivate that research culture. Almost 50 per cent faculty of COEP have PhDs. COEP will have 100 per cent PhD staff in the next four to five years."

Deemed University status will enable COEP to confer its own degrees. Presently even though COEP is an autonomous institute, UoP is the degree-awarding body. Hence under a special arrangement, COEP gives BTech degrees to students instead of conventional BE degrees of UoP.

This complex relationship between UoP and COEP was reflected in the first ever degree-awarding ceremony after COEP's autonomy held at COEP on Monday. After taking legal opinion, UoP did not allow COEP to call the function as convocation ceremony; hence it was called as graduation ceremony.

UoP Vice Chancellor Dr Narendra Jadhav, as chief guest of the ceremony, explained the reasons for the change. He lauded achievement of COEP as unmatched and said that COEP should convert itself into deemed university status.

His suggestion received great applause from the students and alumni present at the ceremony.

When *Sakaal Times* contacted director of COEP, he confirmed that institute was indeed taking concrete steps in the direction.

### GOLD RUSH

■ Nineteen students were conferred gold medals in first and second graduation ceremony of COEP after its autonomy, held here on Monday. COEP board of governors chief Dr F C Kohli and Sakaal Pvt Limited Chairman Prataprao Pawar, who is also on the board of governors, were present

Sakal Times 21/10/8

# Time to turn CoEP into a deemed varsity: V-C

## 1st graduation ceremony of autonomous institute held

**Ashish Jadhav**

Impressed with the achievements made by the College of Engineering Pune (CoEP) since it became an autonomous institute in 2003, vice-chancellor of the University of Pune (UoP), Narendra Jadhav, on Monday said the time had come to turn the college into a deemed university.

He was speaking on the occasion of the first graduation ceremony after the CoEP became an autonomous institute.

Jadhav praised the board of governors and the director of the college for achieving the coveted success.

Speaking on the role of engineers in the rapidly developing Indian economy, he said the centre of gravity was shifting towards the east and India and China were the two countries which would play a major role in the global economy. "The engineers have a major role to play in the development of the Indian economy to match the growth rate of 10% in the coming years," he said, adding, they will also have to lay stress on education, research and industry. He said compared to China, India was far behind in producing PhDs which was not a good sign.

Jadhav gave away the BTech, MTech, grade cards and provisional passing certificates to graduates. The toppers were awarded gold medals.

> "The engineers have a major role to play in the development of Indian economy and to match the growth rate of 10% in the coming years.
> —**Narendra Jadhav**, vice-chancellor, UoP

DNA 21/10/8

# अखेर 'तिचे' शैक्षणिक वर्ष वाया गेले!

पुणे, दि. २१ (प्रतिनिधी) : एका अपघाताने अपंगत्व आल्यानंतर परीक्षेसाठी आवश्यक असणारी उपस्थिती राखण्यासाठी जिवापाड प्रयत्न करूनदेखील तिच्या प्रयत्नांना यश आले नाही. आय. एल. एस. विधी महाविद्यालयामध्ये बी. एस. एल. अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या प्रीती महाडिक या विद्यार्थिनीचे शैक्षणिक वर्ष अखेरीस वाया गेले.

आजारपणाचा व शारीरिक दुर्बलतेचा सहानुभूतीने विचार करून परीक्षेला बसण्याची परवानगी द्यावी, असे विनंती अर्ज तिने केले खरे, परंतु प्राचार्यांनी नियमावर बोट ठेवल्याने तिच्यापुढे पर्यायच उरला नाही.

विद्यार्थिनी बी. एस. एल.च्या पाचव्या वर्षात शिकत आहे. मे महिन्याच्या शेवटी तिला गंभीर अपघात झाला. त्यात तिच्या डाव्या पायाचे हाड मोडले व मणक्याला दुखापत झाली. डॉक्टरांनी तिला तीन महिने सक्तीची विश्रांती घेण्याचा सल्ला दिला होता, असे तिचे वडील सु. के. महाडिक यांनी सांगितले.

या विषयी अधिक माहिती देताना महाडिक म्हणाले, "शैक्षणिक सत्र सुरू झाल्यानंतर पाच ऑगस्ट रोजी आम्ही प्रशासकीय अधिकाऱ्यांना भेटून वैद्यकीय अडचण सांगितली. अभ्यासक्रमाचा कालावधी १८ जुलै ते ३० सप्टेंबर असल्याने तिने लवकरात लवकर हजर व्हावे, असे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले. त्यानुसार काही काळ तिने दररोज रिक्षाने येऊन काही तासांना हजेरी लावली. विद्यापीठाचा पात्रता अर्जही भरला.

मूटकोर्ट व अन्य परीक्षांची पूर्तताही तिने केली होती. मात्र, तरीही किमान उपस्थितीचा निकष पूर्ण न केल्याने तिला परीक्षेला बसू देण्यात आले नाही.

या संदर्भात प्राचार्य वैजयंती जोशी यांचीही भेट घेतली होती, परंतु उपयोग झाला नाही. तसेच, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनाही निवेदन दिले होते.

लोकमत
22/10/7

चिंतन इमेज मेकर्स

# सावकारी पाशाला सरकारने धक्काही लावला नाही

## डॉ. नरेंद्र जाधव यांनीच डागली राज्य सरकारवर तोफ

कोल्हापूर, दि. २५ (प्रतिनिधी) : "शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे राज्याला लांच्छनास्पद आहे, केंद्र व राज्य सरकारने आत्महत्या रोखण्यासाठी 'पॅकेज' दिले, ७१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली, पण शेतकऱ्यांभोवती असणाऱ्या सावकारी पाशाला मात्र सरकारने धक्काही लावलेला नाही आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे ते प्रमुख कारण आहे..." शासनावर असा आरोप कुठल्या विरोधी पक्षाने केलेला नाही, तर ही तोफ डागली आहे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आणि राज्य सरकारनेच नेमलेल्या 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' या एक सदस्यीय संशोधन समितीच्या डॉ. नरेंद्र जाधव यांनी. विदर्भात कृषिमाल विक्रेत्या दुकानदारांनीच सावकारी सुरू केली आहे. या नव्या सावकारीत सर्व प्रमुख पक्षांचे नेते व कार्यकर्ते गुंतल्याची धक्कादायक माहितीही त्यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक [illegible] व समावेशक धोरण केंद्रातर्फे आ[illegible]जित 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे डॉ. जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे होते.

अहवालाद्वारे शेतकऱ्यांची वास्तव स्थिती मांडण्याचा प्रयत्न केला असून, हा अहवाल सरकारधार्जिणा असल्याचा आरोपही निराधार असल्याचेही त्यांनी सांगितले. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने सुमारे पाच हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले, पण या पॅकेजच्या माध्यमातून दूरगामी दिलासा देणाऱ्या (उदा. सिंचन व्यवस्था) योजनांनाच प्राधान्य दिले गेले. मात्र, शेतकऱ्यांना थेट दिलासा देणाऱ्या योजनांसाठी कमी महत्त्व दिले त्यामुळेच आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे. तसेच शासनाने कांहीच न दिल्याची शेतकऱ्यांची भावना झाल्याचे ते म्हणाले.



- विदर्भात कृषिमाल विक्रेत्या दुकानदारांनीच केली सावकारी सुरू
- नव्या सावकारीत सर्व प्रमुख पक्षांचे नेते व कार्यकर्त्यांचा समावेश
- समतोल कृषी विकासाची गरज

महाराष्ट्रातील असमतोल दूर करण्यासाठी समतोल कृषी विकास आखण्याची आवश्यकताही अहवालात मांडली आहे. तसेच राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणांवर कडक ताशेरे ओढल्याचे डॉ. जाधव यांनी सभागृहाला अहवालाचे जाहीर वाचन करून स्पष्ट केले. केंद्र शासनाच्या रोजगार हमी योजना व राष्ट्रीय कृषी योजना अशा योजनांचा जास्तीतजास्त फायदा करून घेण्यात राज्य शासन अपयशी ठरले असून, त्याला कपाळकरंटेपणाच म्हणावा लागेल, असे त्यांनी सांगितले.

परदेशातील कापूस उत्पादकांना तेथील शासन लाखो रुपयांचे अनुदान देते, पण भारतात कापसाच्या पिकाला कसलेही संरक्षण दिलेले नाही. कापूस एकाधिकार योजनाही राज्य शासनाने मोडीत काढली. त्यामुळे खर्च जास्त आणि उत्पादन कमी व दरही नाही, अशा स्थितीत शेतकरी कर्जबाजारी झाला, वैफल्यग्रस्त झाला आणि त्यातूनच तो आत्महत्या करू लागला, असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी मांडले. आत्महत्या रोखायच्या असतील तर कर्जबाजारीपणा रोखला पाहिजे आणि त्यासाठी उत्पादनावर आधारित किंमत मिळाली पाहिजे, पण आजही किमती ठरवताना शेतीमालाला वेगळा आणि औद्योगिक उत्पादनाला वेगळा न्याय का ? असा परखड सवालही डॉ. पाटील यांनी उपस्थित केला.


शेतकऱ्याचा शोषिकपणा त्याचा दुबळापणा समजला जाऊ लागला आणि वसाहतवादी मनोवृत्तीमुळेच शेतकऱ्यांचे हाल होऊ लागले, असे मत ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांनी मांडले. आज आत्महत्येचा विचार करणारा शेतकरी उद्या हत्या करायलाही मागे-पुढे पाहणार नाही, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या अहवालातून शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहणाऱ्यांना झोडपून काढले असून, हा अहवाल सरकारधार्जिणा असल्याचा आरोप शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथदादा पाटील यांनी केला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांची अभ्यास मंडळे घेऊन त्यांची मानसिकता बदलण्यावर भर देण्याची आवश्यकता नागनाथअण्णा नायकवडी यांनी व्यक्त केली.

यावेळी आचार्य शांताराम गरुड, कॉ. गोविंदराव पानसरे यांनीही आपली भूमिका मांडली. स्वागत सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. दांडगे यांनी केले. यावेळी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. ए. ए. डांगे, डॉ. भानुमते आदी उपस्थित होते.

प्रभात 26/10/7

## SEMINAR ON RURAL MARKETING

**"The world has** to take cognisance of India and China together as the fourth economic engine," said Narendra Jadhav, vice-chancellor, University of Pune. He was shedding light on the role of these two nations as major contributors to the global economy at the seminar on 'Rural Marketing – A boon for Economic Development' conducted by the Poona District Education Association's (PDEA) Mahatma Phule Institute of Management (MPIM) on October 19 at Pride Hotel. Earlier, the economic engines of the world comprised just of the US, Europe and Japan, but he believes that India would soon be recognised worldwide.




Jadhav also focused on the opportunities that lie in rural areas and the tremendous potential for development of these areas which would lead India to a greater level. The seminar witnessed eminent personalities like Ashutosh Khosla, director, sales and marketing, Piaggio Ape; Preetam Salvi, business unit head, Shopper's Stop; Ajay Munde, senior area manager, Mahindra and Mahindra Ltd; Anand Shrikhande, director, ACE Money and Shambhu Singh, VP, Kotak Mahindra Bank Ltd.

The seminar was inaugurated by Jadhav, Capt CM Chitale, dean of management studies, Pune University, Mohanrao Deshmukh, treasurer PDEA, principal DB Gadhave, assistant secretary, PDEA, AS Sarkar, director MPIM.

The programme ended with the valedictory function presided then by Chitale.

Dna 27/10/7

चिंतन इमेज मेकर्स

# सावकारी पाशाला सरकारने धक्काही लावला नाही

## डॉ. नरेंद्र जाधव यांनीच डागली राज्य सरकारवर तोफ

कोल्हापूर, दि. २५ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे राज्याला लांच्छनास्पद आहे, केंद्र व राज्य सरकारने आत्महत्या रोखण्यासाठी 'पॅकेज' दिले, ७१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली, पण शेतकऱ्यांभोवती असणाऱ्या सावकारी पाशाला मात्र सरकारने धक्काही लावलेला नाही आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे ते प्रमुख कारण आहे... शासनावर असा आरोप कुठल्या विरोधी पक्षाने केलेला नाही, तर ही तोफ डागली आहे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आणि राज्य सरकारनेच नेमलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या एक सदस्यीय संशोधन समितीच्या डॉ. नरेंद्र जाधव यांनी. वि[illegible] कृषिमाल विक्रेत्या दुकानदारांनीच सावकारी सुरू केली आहे. या नव्या सावकारीत सर्व प्रमुख पक्षांचे नेते व कार्यकर्ते गुंतल्याची धक्कादायक माहितीही त्यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्रातर्फे आयोजित 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे डॉ. जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे होते.

अहवालाद्वारे शेतकऱ्यांची वास्तव स्थिती मांडण्याचा प्रयत्न केला असून, हा अहवाल सरकारधार्जिणा असल्याचा आरोपही निराधार असल्याचेही त्यांनी सांगितले. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने सुमारे पाच हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले; पण या पॅकेजच्या माध्यमातून



■ विदर्भात कृषिमाल विक्रेत्या दुकानदारांनीच केली सावकारी सुरू

■ नव्या सावकारीत सर्व प्रमुख पक्षांचे नेते व कार्यकर्त्यांचा समावेश

■ समतोल कृषी विकासाची गरज

दूरगामी दिलासा देणाऱ्या (उदा. सिंचन व्यवस्था) योजनांनाच प्राधान्य दिले गेले. मात्र, शेतकऱ्यांना थेट दिलासा देणाऱ्या योजनांसाठी कमी महत्त्व दिले त्यामुळेच आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे. तसेच शासनाने काहीच न दिल्याची शेतकऱ्यांची भावना झाल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्रातील असमतोल दूर करण्यासाठी समतोल कृषी विकास आखण्याची आवश्यकताही अहवालात मांडली आहे. तसेच राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणांवर कडक ताशेरे ओढल्याचे डॉ. जाधव यांनी सभागृहाला अहवालाचे जाहीर वाचन करून स्पष्ट केले. केंद्र शासनाच्या रोजगार हमी योजना व राष्ट्रीय कृषी योजना अशा योजनांचा जास्तीतजास्त फायदा करून घेण्यात राज्य शासन अपयशी ठरले असून, त्याला कपाळकरंटेपणाच म्हणावा लागेल, असे त्यांनी सांगितले.

परदेशातील कापूस उत्पादकांना तेथील शासन लाखो रुपयांचे अनुदान देते, पण भारतात कापसाच्या पिकाला कसलेही संरक्षण दिलेले नाही. कापूस एकाधिकार योजनाही राज्य शासनाने मोडीत काढली. त्यामुळे खर्च जास्त आणि उत्पादन कमी व दरही नाही, अशा स्थितीत शेतकरी कर्जबाजारी झाला, वैफल्यग्रस्त झाला आणि त्यातूनच तो आत्महत्या करू लागला, असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी मांडले. आत्महत्या रोखायच्या असतील तर कर्जबाजारीपणा रोखला पाहिजे आणि त्यासाठी उत्पादनावर आधारित किंमत मिळाली पाहिजे, पण आजही किमती ठरवताना शेतीमालाला वेगळा आणि औद्योगिक उत्पादनाला वेगळा न्याय का ? असा परखड सवालही डॉ. पाटील यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्याचा शोषिकपणा त्याचा दुबळेपणा समजला जाऊ लागला आणि वसाहतवादी मनोवृत्तीमुळेच शेतकऱ्यांचे हाल होऊ लागले, असे मत ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांनी मांडले.

डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या अहवालातून शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहणाऱ्यांना झोडपून काढले असून, हा अहवाल सरकारधार्जिणा असल्याचा आरोप शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथदादा पाटील यांनी केला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांची अभ्यास मंडळे घेऊन त्यांची मानसिकता बदलण्यावर भर देण्याची आवश्यकता नागनाथअण्णा नायकवडी यांनी व्यक्त केली.

लोकमत
26/10/7

चिंतन इमेज मेकर्स

# German varsity seeks Indian connection

## Opens liaison office at Pune and Mumbai varsity campuses

**REPORTER**
reporters@sakaaltimes.com

**Pune:** The minister president of the State of Lower Saxony, Germany, Christian Wulff, inaugurated the University of Gottingen liaison office located in the International Student Centre at the University of Pune (UoP) on Saturday.

Wulff accompanied by a large delegation comprising business leaders and academia on Friday opened a similar liaison office at Mumbai to facilitate student exchange programmes and to augment trade and commerce.

German minister said, "The liaison office and the Memorandum of Understanding (MoU) signed last year between the two universities will boost scientific cooperation among faculties and scholars paving way for an industrial partnership at a later stage.

"We consider UoP as one of the best Indian campuses and this partnership as one of the finest to be counted. Hence, reciprocating the gesture we have allotted space to the UoP to open a liaison office in the Gottingen campus," he added.

### NOBEL SCHOOL

■ Established in 1737, the Georg-August-Universitat-Gottingen to its credit has 44 Nobel laureates coming from its campus.

Wulff pointed out that in the next 10 years German auto major Volkswagen would dominate as the foremost automobile player globally surpassing Toyota. For this very reason, by 2010 the Volkswagen, Pune unit would absorb around 2,500 people making it a vital player in the race.

UoP vice chancellor Narendra Jadhav said that the MoU would facilitate exchange of students, faculties, joint research programmes and conducting programmes in each other's campus.

He said that Gottingen campus was contemplating to establish a Modern Indian Studies Centre in Germany.

>>Continued on P13

Sakal Times

## बेगडी अहवाल

■ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्या संबंधातील पत्रकार पी. साईनाथ यांचे विवेचन, महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अहवालावरील विवेचन व त्याबाबतच्या प्रतिक्रिया 'लोकसत्ता'ने निर्भीडपणे छापल्याबाबत प्रथमतः 'लोकसत्ताचे' अभिनंदन!

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, राष्ट्रीय प्रमाणाशी ताडण्याची वृत्ती अत्यंत अमानवी व मूळ मुद्यांपासून दर नेणारी आहे. डॉ. जाधव यांचा अहवाल शासकीय लाभावर डोळा ठेवल्याचा आरोप व त्यावरील त्यांचा प्रतिसाद माझ्यासारख्या सामान्य माणसास अचंबित करणारा आहे. अहवाल मूळ उद्देशांपासून दूर जाणारा व व्यक्तिसापेक्ष आहे हे सामान्य शे[illegible] सुद्धा सांगू शकेल. वातानुकूलित व हस्तीदंती मनोऱ्यामध्ये बसून 'डेटा ॲनालिसिस' करण्याची प्रवृत्ती निषेधार्ह आहे. आपल्याला सर्वच विचार आयात करावे लागतात व विचारांचीही सुपारी घ्यावी लागते काय, अशी शंका वाटण्याइतपत परिस्थिती आहे. परदेशांत मनुष्यप्राण्याच्या जीवित व सुरक्षिततेला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे तथाकथित विद्वान सांगतात ते खरे मानण्यास प्रत्यवाय नाही. देशामध्ये वा महाराष्ट्रामध्ये किती टक्केवारीने शेतकऱ्यांनी आत्महत्या केली हा माझ्या दृष्टीने महत्त्वाचा विषय एवढ्यासाठी नाही, कारण टक्केवारीची टक्केवारी प्रमाण मानून चर्चा सुरू केली की मूळ उद्देशच बाजूला पडतो. आपण मनुष्यजीवाची किंमत, मानवी हक्कांची, जीवन जगण्याची किंमत करायला व त्याला सन्मान अथवा प्राथमिकता द्यायला केव्हा शिकणार आहोत? मनुष्यबळ विकास नावाचे खाते निर्माण करून आपण नेमके उलट्या दिशेने जात आहोत. भांडवलदारी विचारसरणीचा गाभा मनुष्यजीवाची किंमत शून्य करावी असा असेल, तर आपण विनाशाकडे निघालो आहोत असे सांगायला कोण्या महात्म्याची जरुरी नाही.

शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतीमालाला भाव, शेती उत्पादनास संरक्षण, शेतकऱ्यांचे प्रबोधन व राजकारणविरहित संघटन या प्राथमिकता असल्या पाहिजेत. शेतीमाल पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा दर व्यापाऱ्यांनी, उद्योजकांनी ठरवायचा आणि शहाजोगपणे जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरणाचा डोस द्यायचा हे योग्य नाही. शेतीप्रधान देशाचे दुष्टचक्र संपविण्यासाठी, भोंदू विद्वानांना प्रथम बाजूला ठेवावे लागेल अन्यथा अशा अहवालांची भाषांतरे होऊन पोटे भरली जातील. म्हणूनच विशेषतः पी. साईनाथ, चंद्रकांत वानखेडे, श्रीनिवास खांदेवाले यासारख्या सत्यप्रिय नागरिकांचे अभिनंदनच करायला हवे.

डॉ. धनंजय देवी, सातारा

लोकसत्ता
7/10/07



जलगांव पीपल्स बैंक पिंपरी शाखा का मंगलवार को उद्घाटन डॉ. नरेंद्र जाधव के हाथों संपन्न हुआ. इस समय स्मिता पाटिल, भास्कर शेलके, दादा नेवे, विलास बोरवले, अध्यक्ष भालचंद्र पाटिल, प्रागजीभाई गुजराती आदि उपस्थित थे.

# कोर बैंकिंग सुविधा ग्राहकों की आवश्यकता बन गई है : नरेंद्र जाधव

## जलगांव पीपल्स बैंक पिंपरी शाखा का उद्घाटन संपन्न

पिंपरी, 7 अक्टूबर (आ.प्र.)

कोर बैंकिंग प्रणाली से बैंकिंग कार्यों में तेजी और पारदर्शिता आई है. इस माध्यम से मिलनेवाली जल्द सेवा की वजह से 'कोर बैंकिंग' सुविधा ग्राहकों की आवश्यकता ही बनने लगी है. यह विचार पुणे यूनिवर्सिटी के कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव ने प्रकट किए.

जलगांव पीपल्स बैंक की पिंपरी शाखा का मनपा बिल्डिंग के सामने उद्घाटन उनके हाथों संपन्न हुआ. इस समय वे बोल रहे थे. राज्य के सहकारी संस्था के अपर आयुक्त व विशेष निबंधक के हाथों बैंक के 'बायो-एटीएम' केंद्र का उद्घाटन किया गया. बैंक के अध्यक्ष भालचंद्र पाटिल, संचालक दत्तात्रय चौधरी, स्मिता पाटिल, प्रागजीभाई गुजराती, प्रा. विलास बोरोले, नामदेव चौधरी, बैंक के महाव्यवस्थापक सतीश वाणी, बी.एस. कांबले, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पारकर यहां उपस्थित थे.

चिंतन इमेज मेकर्स

आज का आनंद 8/10/07